अक्विल्ला व प्रिस्किल्ला, तंबू तयार करण्याचा 'जोड व्यवसाय' करणारे होते

# स्वयंसेवक स्वतः ची उपजीविका स्वतः चालवतात आणि ख्रिस्ताच्या शरीररुपी मंडळीत सेवा करतात

मुलांना शिकवणाऱ्यांनी **V3b** हा अभ्यासक्रम वाचावा

**1. नवीन सेवकांना दाखल करुन घेण्यासाठी प्रार्थना व देवाचे वचन या द्वारे तुम्ही आपल्या अंतः करणाची व मनाची तयारी करा.**

**प्रार्थना:** "हे प्रभू येशू, आम्ही तुझ्यावर प्रेम करतो आणि तुझी सेवा करण्याची आमची इच्छा आहे. कृपा करून आमच्या हातच्या कामाला यश दे, त्याची भरभराट कर म्हणजे आमच्या दैनंदिन गरजा आम्हांला भागवता येतील, तुझ्या मंडळीची सेवा करता येईल आणि दुर्लक्षित ठिकाणी तुझ्या राज्याचा विस्तार करता येईल"

अनेक ठिकाणी ख्रिस्ताच्या शरीररुपी मंडळीत सेवा करताना मेंढपाळ आणि प्रेषितांना, अक्विल्ला व प्रिस्किल्ला यांच्याप्रमाणे, उपजीविका चालवण्यासाठी अन्य काही व्यवसाय असणे अगत्याचे आहे. हयामध्ये पुढील ठिकाणांचा समावेश होतो......


अ. ज्याठिकाणी विश्वासणारे अनेक नव्या मंडळया व गट सुरु करतात

ब. ज्याठिकाणी तुम्ही अथवा तुम्ही पाठवलेल्या प्रेषितांनी कष्टांच्या संबंधात, पौलाने थेस्सलनीका येथील आळशी ख्रिस्ती लोकांच्या बाबतीत, 2 थेस्सल 3:6-13, दाखवला तसा योग्य टृष्टीकोन दाखवणे आवश्यक असते.

क. ज्याठिकाणी नागरी अधिकारी येशूच्या अनुयायांचा विरोध करतात.

ड. ज्याठिकाणी विश्वासणारे अत्यंत गरीब असतात आणि आपल्या पाळकांना पगार देणे शक्य नसते तसेच अनेक नव्या ने त्यांना सातत्याने प्रशिक्षण द्यायचे असते

तुमच्या मंडळीतील लोक फळ देतात. नवीन गट व मंडळ्या सुरु करतात, तेव्हा तुम्ही नवीन नेत्यांची भरती केलीच पाहिजे. तसेच त्यांनी काय करायचे आणि ठामपणे सेवा कशी करायची याबद्दल मार्गदर्शन केले पाहिजे. तुम्ही इतर गावांमध्ये आणि दूरवरच्या ठिकाणी नव्या मंडळ्या सुरु करता तेव्हा तुम्ही किंवा तुम्ही पाठवलेले प्रेषित ह्यांनी स्वतःच्या उपजीविकेसाठी स्वतःचा व्यवसाय सुरु करणे उत्तम.



**अक्विल्ला व प्रिस्किल्ला ह्यांचा लहानसा व्यवसाय होता आणि पौल त्यांच्याकडे कामाला होता.**

**प्रे. कृ. 18:1-3 ह्या वचनांत शोधा**

- अक्विल्ला व प्रिस्किल्ला ह्यांचा कशाचा लघु उघोग होता. (18:3)
- ते आपला व्यवसाय सोबत घेउन कोणते शहर सोडून आले. (2)
- त्यांनी कोणत्या गरजू सुवार्तिकाला आपल्याबरोबर कामाला ठेवले. (3)

**प्रे. कृ. 18:24-26 ह्या वचनात शोधा**

- अक्विल्ला व प्रिस्किल्ला ह्यांनी आपल्या घरात कोणाला अधिक शिक्षण दिले
- त्यांना अपुल्लो कोठे भेटला: *(सभास्थान म्हणजे यहूदी लोकांचे प्रार्थनेचे ठिकाण)*

**रोम 16:3-5 ह्या वचनात शोधा**

- स्वत:चा चरितार्थ स्वत: चालवणाऱ्या अक्विल्ला व प्रिस्किल्ला ह्यांचे वर्णन प्रषित पौल कसे करतो (3)
- ते आणि पौल एकत्रित काम करीत असलेले ठिकाण सुरक्षित होते की तेथे धोका होता (4)
- ते ज्या मंडळीत जात ती मंडळी कोठे एकत्र जमत असे. (5)

**2. तुमच्या सहकाऱ्यांच्या बरोबर चर्चा करुन आठवडयाचे कार्यक्रम आणि नवीन मंडळया सुरु करण्या विषयी योजना करा.**

अक्विल्ला व प्रिस्किल्ला यांच्याविषयी तुम्ही काय शिकलात त्याबद्दल तुमच्या सहकाऱ्यांबरोबर उजळणी करा. तुमच्या सहकाऱ्यांना दोन कोम आहेत हे समजावून सांगा एक लौकीक काम यामुळे त्यांचा चरितार्थ चालतो आणि दुसरी पाळकीय सेवा ही ते प्रभुसाठी करतात. नवीन मंडळ्या सुरु करता याव्यात यासाठी मंडळीला एखादा लहानसा व्यवसाय सुरु करता येईल का याबद्दल सभासदांशी चर्चा करा.

त्यांनी कोणत्या प्रकारचा लघु उद्योग सुरु करावा याचे मार्गदर्शन करा.

- व्यवसाय सहजपणे उचलून दुसऱ्या गावात वा शहरात नेऊन सुरु करता आला पाहिजे.
- व्यवसाय त्यांना स्वत:ला चालवता येईल इतका छोटा आटोपशीर असला पाहिजे.
- व्यवसायामध्ये नवीन मंडळ्या सुरु करण्यासाठी काम करणाऱ्या सहकाऱ्यालाही सहभागी करून घेता आले पाहिजे.
- व्यवसाय सहजपणे सुरु करता येव्याजोगा असावा, त्यामध्ये साधे तंत्रज्ञान आणि स्वस्त सामग्री वापरलेली असावी.
- व्यवसायामुळे स्थानिक समाजातील लोकांशी संपर्क साधता आला पाहिजे.
- व्यवसायामध्ये जोड- व्यवसाय करणाऱ्यांना कामाचे तास निवडण्याची मुभा असली पाहिजे.
- व्यवसाय त्यांना त्यांच्या स्वत:च्या घरी राहून प्रभुची सेवा करता येईल असा असला पाहिजे.

**प्रार्थना** करुन व्यवसायाच्या संबंधात प्रभुची इच्छा काय आहे ते जाणून घ्या.

चर्चा करा- त्यांनी कोणत्या प्रकारची पाळकीय सेवा करावी. त्यांच्याकडे अनेक साधने किंवा भरपूर मोकळा वेळ नसणार त्यांनी पुढील गोष्टी केल्याच पाहिजेत....

- इतरांनी नव्या मंडळीसाठी आपल्या घराची दारे खुली करेपर्यन्त त्यांनी आपल्याच घरात नव्या मंडळीचे पुढारीपण करावे.
- सार्वजनिक ठिकाणी वा प्रार्थना मंदिरात नाही तर लहान लहान गटांमध्ये शिष्य करा.
- नव्या पुढाऱ्यांना खाजगीरित्या किंवा लहानशा गटांमध्ये प्रशिक्षण दया.
- नव्या पुढाऱ्यांना तत्काळ नव्या मंडळीची जलाबदारी सोपवून द्या.
- प्रशिक्षणासाठीचे साहित्य जमा करा, जसे तुम्ही सध्या वाचन करीत आहात तो अभ्यासक्रम स्वस्त, सहजपणे कागदावर उतरवून घेता येईल असा आणि निवड करण्यास पर्यायी असतील असा असावा.

**3. तुमच्या सहकाऱ्यांच्या बरोबर चर्चा करुन येणाऱ्या उपासना सभेसाठी योजना करा.**

सध्याच्या गरजा आणि स्थानिक रिवाज ह्यांना अनुरुप अशा कृती निवडा.

वाचा भाग 1 मध्ये दिलेले पवित्र शास्त्रातील शास्त्रपाठ आणि अक्विल्ला व प्रिस्किल्ला ह्यांची गोष्ट सांगा.

नाटयकरण करा अक्विल्ला व प्रिस्किल्ला ह्यांचा वृत्तांत.

भाग 1 मध्ये तुम्ही अभ्यास केलेल्या वचनांवर आधारित प्रश्न विचारा. विश्वासणाऱ्यांनी जोड–व्यवसायाच्या कामाविषयी बोलावे यासाठी प्रोत्साहन द्या.

देवाने, जोड व्यवसाय करणाऱ्या सेवकांचे कार्य कसे आशीर्वादित केले याविषयी त्यांना साक्ष देण्यास सांगा.

स्वत: च्या उपजीविकेसाठी काम करतानाच ख्रिस्ताच्या शरीररुपी मंडळीची सेवा कोणत्या मार्गांनी करता येईल हे पाहण्यास विश्वासणाऱ्यांना प्रोत्साहन द्या

मुलांना, त्यांनी तयार केलेली नाटिका, कविता व प्रश्न सादर करण्यास सांगा.

प्रभु भोजनाची ओळख करुन देण्यासाठी, मत्तय 22:1–14 वाचा. यामध्ये एक मनुष्य लग्नाच्या मेजवानीस योग्य पोषाख न करता जातो. याची याची तुलना वेदीपाशी सेवा करण्यास जाताना अहरोन घालत असलेल्या याजकाच्या खास पोषाखाशी करा. हे स्पष्ट करुन सांगा की आम्ही सुद्धा प्रभुच्या मेजापाशी येतो तेव्हा आम्ही ''ख्रिस्ताला'' आमचा आध्यात्मिक पोषाख म्हणून परिधान केले पाहिजे.

प्रे. कृ. 20:33–35 ही वचने एकत्रित पाठ करा

विश्वासणाऱ्यांना एकमेकांना प्रोत्साहन देता यावे, एकत्रित योजना आखता यावी तसेच एकमेकांकरीता आणि दुर्लक्षित गावांमध्ये राहणाऱ्या लोकांकरीता प्रार्थना करता यावी यासाठी त्यांचे लहान लहान गट करा.

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net